**पंतप्रधानांची गंगा तलावाला भेट (12 मार्च 2025)**

12 मार्च 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मॉरिशसमधील पवित्र गंगा तलावाला भेट दिली.  या ठिकाणी त्यांनी पूजा केली आणि त्रिवेणी संगम येथील पवित्र जल या पवित्र स्थळी अर्पित केले.

2. महाकुंभ मेळ्यातील पवित्र जल गंगा तलावात अर्पित करण्याची पंतप्रधानांची कृती, दोन्ही देशांमधील आध्यात्मिक एकतेचे प्रतीक दर्शवते. त्याचसोबत दोन्ही देशांच्या सामायिक सांस्कृतिक संबंधांचा पाया असलेल्या समृद्ध परंपरांचे जतन आणि संवर्धन करण्याची वचनबद्धता देखील दर्शवते.

पोर्ट लुईस

12 मार्च 2025